**नागरी दलित वस्ती सुधारणा योजना..**
**जिल्हाधिका-यांकडे सुपूर्द करणे व**
**योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता**
**मार्गदर्शक तत्वे विहित करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र.विघयो-१०२०००/१५१२/प्र.क्र.२८२/नवि-४.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक :- ५ मार्च, २००२.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र.विघयो-१०९४/२४१/प्र.क्र.२१/नवि-४, दि. २४ जानेवारी, १९९६.
२) शासन निर्णय, नगर विकास विभाग, क्र.विघयो-१०९७/१६७३/प्र.क्र.४४/९७/नवि-४, दि. ५ फेब्रुवारी, १९९८.

**प्रस्तावना:-**

राज्यातील नागरी क्षेत्रातील विशेष घटक लोकसंख्येच्या कल्याणासाठी शासनाने उक्त संदर्भ क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये "नागरी दलित वस्ती सुधारणा योजना" नावाची योजना सन १९९५-९६ या आर्थिक वर्षापासून सुरु केलेली आहे. या योजनेचे सुधारीत व सर्वकष निकष तसेच योजनेची कार्यपध्दती उपरोक्त संदर्भ क्र.(२) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली आहे.

०१. "नागरी दलित वस्ती सुधारणा योजना" योजना ही 'जिल्हास्तरीय' व 'विशेष घटक लाभार्थी' साठीची योजना असल्याने या योजनेच्या तरतुदी विशेष घटक योजनेच्या जिल्हा वार्षिक योजनेमधून उपलब्ध केल्या जातात. अशाच प्रकारची योजना ग्रामीण भागासाठी समाजकल्याण विभागामार्फत देखील राबविण्यात येते. विकेंद्रीकरणाच्या धोरणाला अनुसरुन समाज कल्याण विभागाने दि. ८ नोव्हेंबर, २००० च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण भागातील "दलित वस्ती सुधारणा योजना" ही योजना जिल्हापरिषदेकडे वर्ग करण्याचा निर्णय घेतला आहे. याच धर्तीवर नागरी भागातील "दलित वस्ती सुधारणा योजना" या योजनेचे जिल्हा स्तरावरील संनियंत्रण संबंधीत जिल्हाधिका-यांकडे देण्याबाबत तसेच योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता मार्गदर्शक तत्वे विहित करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

(कृ.मा.प.)

**शासन निर्णय :-** "नागरी दलित वस्ती सुधारणा योजना" या योजनेचे यापुर्वी निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करुन या योजनेचे संनियंत्रण जिल्हा स्तरावर करण्यास व ते संबंधीत जिल्हाधिकारी, यांचेकडे सुपूर्द करण्यास तसेच योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे विहित करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे.

**मार्गदर्शक तत्वे :-**

१) या योजनेतंर्गत हाती घेण्यात येणा-या कामांसाठी १००% राज्य शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.

२) सदरची योजना राज्यातील केवळ नागरी भागासाठी लागू असून ती जिल्हास्तरीय तसेच विशेष घटक लाभार्थीसाठीची योजना असल्याने त्यासाठी विशेष घटक योजनेच्या जिल्हा वार्षिक योजनेमधून तरतूद होणे आवश्यक राहील. संबंधीत जिल्हा नियोजन व विकास मंडळाने जिल्हयातील नागरी संस्थांची संख्या व त्यांना अनुज्ञेय असलेले कमाल अनुदान लक्षात घेऊन वार्षिक योजनेची आखणी करावी.

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | कमाल अनुज्ञेय अनुदान |
|---|---|---|
| १ | महानगरपालिका | रु. १००.०० लक्ष |
| २ | "अ" वर्ग नगरपरिषद | रु. ५०.०० लक्ष |
| ३ | "ब" व "क" वर्ग नगरपरिषद | रु. २५.०० लक्ष |

३) एका आर्थिक वर्षामध्ये या योजनेतंर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दर्जा निहाय उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे वित्तीय मर्यादेपर्यंत कमाल अनुदान अनुज्ञेय राहील. तथापि, उपरोक्त नमूद करण्यात आलेली कमाल वित्तीय मर्यादा -

(अ) जेंव्हा जिल्हयातील एकूण नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी काही नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी परिपूर्ण प्रस्ताव विहित मुदतीत जिल्हाधिका-यांकडे सादर न केल्यास अथवा इतर कारणामुळे जिल्हयासाठी उपलब्ध असलेली तरतुद आर्थिक वर्षाअखेर शिल्लक रहात असेल.

अशा अपवादात्मक परिस्थितीमध्ये "शासनाच्या पूर्वसंमतीने", जिल्हयातील इतर विशेष घटक लाभार्थी जनतेला सोई सुविधा देण्याकरिता शिथील करता येईल. मात्र यासाठी संबंधीत जिल्हाधिकारी, यांनी शासनास अशा प्रकारचा स्वयंस्पष्ट व परिपूर्ण स्वतंत्र प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहील. आर्थिक निकष शिथील केल्यामुळे संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस

त्यांना विहित दराने अनुज्ञेय इतक्या कमाल मर्यादेपर्यंत 'अतिरिक्त अनुदान' एका आर्थिक वर्षामध्ये अनुज्ञेय राहील. व यासाठी संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी अतिरिक्त निधीच्या मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव स्वतंत्रपणे संबंधीत जिल्हाधिकारी. यांचकडे सादर करणे आवश्यक राहील.

४) या योजनेतंर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचीत जाती तसेच नव बौध्दांसाठी आरक्षित असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसूचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात खाली नमूद करण्यात आलेली नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतील.

५) शहरातील अनुसूचित जाती व नवबौध्द यांचेसाठी आरक्षित प्रभाग तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द नागरीकांचे प्रमाण जेथे तुलनेत अधिक असेल तेथे प्राधान्याने (उतरत्या क्रमाने ) या योजनेतंर्गतची अनुज्ञेय कामे हाती घेण्यात यावीत.

६) <u>योजनेतंर्गत अनुज्ञेय असलेली कामे :-</u>

अ) रस्ते, पोच-रस्ते, जोड-रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, सिमेंटीकरण (अत्यंत अपवादात्मक परिस्थितील वस्त्यांकरिता कच्चे रस्ते), नाली बांधकाम, लहान नाल्यावर फरशी बांधणे, विहीर दुरुस्ती तसेच उघडया विहिरीवर कठडे बांधणे, नदीच्या काठावर अथवा डोंगर उतारावर संरक्षक भिंती तसेच कठडे बांधणे, छोटे पूल, पिण्याच्या पाण्यासाठी सोई सुविधा, (हापसा, पाण्याची टाकी) सार्वजनिक उपयोगासाठी मुता-या व शौचालये बांधणे, रस्त्यावरील विजेचे दिवे, बालवाडी, बगीचे, बगीच्यांमध्ये पक्क्या स्वरुपाचे बसवायचे खेळाचे साहित्य, समाज मंदिर, वाचनालय, व्यायामशाळा, दवाखाने,सांस्कृतिक केंद्र, दुकाने, स्मशान भूमीचा विकास ही व या सारखी सार्वजनिक हिताची अन्य कामे हाती घेता येतील.

वरील कामांव्यतिरिक्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस स्थानिक गरजेनुसार एखादे काम या योजनेतंर्गत हाती घ्यावयाचे असल्यास व ते योजनेच्या अटी व शर्तींची पूर्तता करीत असल्यास असे काम शासनाच्या पूर्व संमतीने घेता येऊ शकेल.

ब) या योजनेतंर्गत कामे हाती घेताना "पायाभूत सेवा सुविधांच्या" कामांना प्राधान्य असणे आवश्यक राहील.

क) शहराच्या मंजूर विकास योजनेतील प्रस्तावानुसार अनुज्ञेय असलेली विकास योजनेंतर्गत कामे या योजनेंतर्गत हाती घेता येतील.

ड) या योजनेतंर्गत हाती घेतलेल्या कामांची भविष्यातील दुरुस्ती व देखभाल याचा खर्च स्थानिक संस्थेने स्वत:च्या निधीतून करावा. प्राप्त अनुदान कोणत्याही परिस्थितीत देखभाल अथवा दुरुस्तीसाठी वापरु नये.

७) **अनुदान अनुज्ञेय होण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याची कार्यपध्दती :-**

अ) या योजनेतंर्गत अनुदान अनुज्ञेय होण्यासाठी प्रस्तावित कामांची "निवड व निश्चिती", करणारा संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव असणे आवश्यक राहील.

ब) या योजनेतंर्गत वरील नमूद केल्याप्रमाणे अनुज्ञेय प्रभागामध्ये हाती घ्यावयाच्या बांधकाम विषयक कामांसाठीचे रेखांकन/नकाशे संबंधीत नगरपरिषदे संदर्भात जिल्हा स्तरावरील नगर रचना कार्यालयातील अधिका-यांकडून व महानगरपालिका संदर्भात महानगरपालिकेच्या नगररचना अधिका-यांकडून मंजूर करुन घेणे आवश्यक राहील. जिल्हा स्तरावरील नगररचना कार्यालयाने संबंधीत नगरपरिषदेचा बांधकाम विषयक प्रस्ताव महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ नुसार सुसंगत आहे की नाही हे तपासणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने विकास योजनेचा जमीन वापर व आरक्षणाबाबत सखोल छाननी अपेक्षित आहे.

क) रेखांकन/नकाशे मंजूरीनंतर हाती घ्यावयाच्या कामावरील खर्चाच्या तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकास प्रचलित कार्यपध्दतीनुसार नगरपरिषदाबाबत संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभाग अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अथवा नगररचना विभागातील अंमलबजावणी कक्ष येथील सक्षम प्राधिका-याची तांत्रिक मंजूरी घेणे आवश्यक राहील.महानगरपालिकांच्या बाबतीत संबंधीत महानगरपालिकेचे 'नगर अभियंता' प्रस्तावास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असतील.

ड) अशा प्रकारे रेखांकन मंजूरी तसेच तांत्रिक मंजूरी प्राप्त करुन तयार करण्यात आलेला प्रस्ताव निधीच्या उपलब्धतेसाठी संबंधीत जिल्हाधिकारी, यांचेकडे सादर करण्यात यावा.

इ) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी शासनाने विहित केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन आवश्यक त्या सहपत्रांसह निधीच्या मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्यानंतर संबंधीत जिल्हाधिकारी, यांनी प्रस्तावाची सखोल तपासणी करावी. जिल्हयासाठी उपलब्ध असलेली तरतूद लक्षात घेऊन निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तावास

जिल्हास्तरीय समितीची "प्रशासकीय व वित्तीय" मान्यता प्रदान करावी. या योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांना पूर्व प्रशासकीय मंजूरी आवश्यक असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत कार्योत्तर प्रशासकीय मंजूरी देण्यात येऊ नये.

८) <u>प्रस्तावासोबत सादर करावयाची प्रमाणपत्रे:-</u>

अ) प्रस्तावित कामांसाठी शासनाच्या इतर कोणत्याही योजनेतंर्गत अर्थसहाय्य घेतले नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.

ब) प्रस्तावातील काम ज्या जमिनीवर घ्यावयाचे आहे ती जमिन नगरपरिषद/महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र.

क) प्रस्तावित कामांची "निवड व निश्चीती" करणारा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव.

ड) प्रस्तावित काम हे ज्या वस्तीतील अनुसूचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्यापेक्षा अधिक आहे अथवा अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या प्रभागातीलच असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

इ) सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त झालेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशाची प्रत.

ई) बांधकाम विषयक काम असल्यास नगररचना शाखेकडून प्रस्तावित कामाच्या रेखांकन/नकाशांना मजूरी प्राप्त झाल्याच्या आदेशाची प्रत.

फ) मागील आर्थिक वर्षांमध्ये प्राप्त झालेल्या निधीचा पूर्णपणे विनियोग करुन त्याचे विनियोग प्रमाणपत्र प्रस्तावा सोबत सादर करणे आवश्यक राहील.

९) <u>निधी वितरण विषयक कार्यपध्दती :-</u>

"नागरी दलित वस्ती सुधारणा योजना" या योजनेसाठी उपलब्ध जिल्हानिहाय तरतुदीचे वितरण प्रत्येक आर्थिक वर्षासाठी स्वतंत्रपणे शासनाकडून सर्व जिल्हाधिका-यांना आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस करण्यात येईल. शासनाने वितरीत केलेल्या जिल्हानिहाय तरतूदी प्राप्त झाल्यानंतर जिल्ह्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीचे वितरण निश्चित करण्यासाठी खालील प्रमाणे "जिल्हास्तरीय समिती" जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात येत आहे.

**नगरपरिषदांबाबत :-**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | जिल्हाधिकारी | -- | अध्यक्ष |
| ब) | सहाय्यक संचालक/ नगररचनाकार (संबधित जिल्हा) | -- | सदस्य |
| क) | विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी (संबंधित जिल्हा) | -- | सदस्य |
| ड) | नगरपरिषदांचे मुख्याधिकारी (प्रस्ताव सादर केलेल्या ) | -- | विशेष निमंत्रित. |
| इ) | जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासनाचे अधिकारी. | -- | सदस्य सचिव. |

**महानगरपालिकाबाबत:-**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | जिल्हाधिकारी | -- | अध्यक्ष |
| ब) | महानगरपालिकेतील नगररचना शाखा अधिकारी | -- | सदस्य |
| क) | विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी (संबंधित जिल्हा) | -- | सदस्य |
| ड) | संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त अथवा त्यांचे प्रतिनिधी | -- | विशेष निमंत्रित. |
| इ) | जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासनाचे अधिकारी. | -- | सदस्य सचिव. |

**(टिपः वित्त विभागाने वेळोवेळी निधी वितरणाविषयक निर्गमित केलेल्या आदेश/सूचनांनुसार निधी वितरणाची दक्षता जिल्हाधिकारी कार्यालयाने घ्यावी.)**

१०) **जिल्हास्तरीय समितीची कार्यकक्षा पढील प्रमाणे असेल :-**

**अ)** . जिल्हा वार्षिक योजनेत उपलब्ध असलेल्या "विशेष घटक योजनेच्या" तरतूदीमधून जिल्ह्यातील नागरी संस्थांची (महानगरपालिका व नगरपरिषदाची ) संख्या व दर्जा (उदा.'अ', 'ब', 'क' वर्ग नगरपरिषदा ) विचारात घेऊन योजनेच्या निकषानुसार अनुज्ञेय असलेले कमाल अनुदान वितरीत करणे.

(*) ३) ह्या योजनेंतर्गत नागरी स्थानिक संस्थेस वितरीत करण्यात आलेला निधी संबंधीत आर्थिक वर्षा अखेर खर्च करणे आवश्यक राहील व त्याप्रमाणे "विनियोग प्रमाणपत्रे" एक वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहील.

* (अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत विनियोग प्रमाणपत्र सादर करणेसाठी मुदतवाढ देण्यास संबंधीत जिल्हाधिकारी सक्षम असतील मात्र अशा नागरी संस्थांच्या अडचणीची खातरजमा करावी.)

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी त्यांना यापूर्वी वितरीत करण्यात आलेल्या निधीची विनियोग प्रमाणपत्रे सादर न केल्यास पुढील अर्थसहाय्य मंजूर करण्यात येवू नये.

४) वरील प्रमाणे विहित करण्यात आलेल्या निकषानुसार राज्य शासनाकडून वितरीत करावयाचा निधी या योजनेशी संबंधीत विभागाच्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष "२२१७ - नगर विकास, १९१ - स्थानिक संस्था, महानगरपालिका, नगर विकास प्राधिकरणे, नगर सुधार मंडळे, इ. सहाय्य पंचवार्षिक योजनेतंर्गत योजना (२३) नागरी भागातील दलित वस्तीमध्ये सुविधा पुरविणे (२२१७११४१)" या लेखाशिर्षाखालील संबंधित आर्थिक वर्षात उपलब्ध अर्थसंकल्पीय जिल्हानिहाय तरतूदीमधून खर्ची घालण्यात यावा.

## ११) इतर उपाय योजना :-

या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोणातून संबंधीत जिल्हाधिकारी, यांचेकडे या योजनेच्या जिल्हास्तरावरील "संनियंत्रणाची" जबाबदारी सोपविण्यात येत आहे.

अ) संबंधीत जिल्हाधिकारी यांनी जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या बैठकीत जिल्ह्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची संख्या व योजनेची वित्तीय मर्यादा लक्षात घेऊन आपल्या जिल्ह्यासाठी या योजनेंतर्गत आवश्यक असलेली तरतूद उपलब्ध करुन घ्यावी. तसेच या योजने संदर्भात जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत आवश्यक ती माहिती मा. अध्यक्ष व सर्व सदस्यांना उपलब्ध करुन दयावी. एखादया जिल्हयासाठी आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस या योजनेतंर्गत जिल्हा वार्षिक योजनेमध्ये पूर्णपणे तरतूद उपलब्ध करुन घेणे शक्य न झाल्यास जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत उपलब्ध बचतीतून पुर्नविनियोजनाद्वारे आवश्यक ती तरतूद उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करावी.

ब) सर्व जिल्हाधिका-यांनी त्यांचेकडे दर महिन्यास आयोजित करण्यात येणा-या मुख्याधिका-यांच्या बैठकीमध्ये या योजनेच्या प्रगतीचा आढावा घ्यावा/आवश्यकता भासल्यास यासाठी विशेष बैठक बोलवावी व या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात.

ब) जिल्हाधिकारी, यांनी या समितीची प्रत्येक आर्थिक वर्षात किमान तीन महिन्यातून एक बैठक आयोजित करावी. (आवश्यकतेनुरुप जादा बैठका घेण्याची मुभा जिल्हाधिका-यांना असेल.)

क) संबंधीत जिल्हयाचे नगररचना शाखेच्या अधिका-यांनी जिल्हयातील नगरपरिषदांकडील बांधकाम विषयक कामकाज असल्यास उपरोक्त परि.(७)(ब) प्रमाणे छाननी करुन अहवाल प्रत्येक बैठकीत द्यावा. महानगरपालिकेबाबत संबंधीत नगर रचना अधिकारी यांची हीच जबाबदारी राहील.

ड) विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी संबंधित जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत उपलब्ध तरतूद पुरेशी आहे काय, हे पाहून जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या बैठकीत पुरेशी तरतूद उपलब्ध करुन घेण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील रहावे. तसेच संबंधीत नागरी संस्थेने हाती घेतलेले काम योजनेच्या निकषानुसार होत आहे किंवा कसे याबाबत "प्रत्यक्ष स्थळ पाहणी" करुन अहवाल प्रत्येक बैठकीत द्यावा.

इ) जिल्हाधिकारी, कार्यालयातील नगरपालिका प्रशासनाचे अधिकारी यांनी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकांचे आयोजन करणे, इतिवृत्त तयार करणे, तसेच संबंधित जिल्हयातील नागरी संस्थांचे निधी मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव उपरोक्त परिच्छेद-८ मधील कागदपत्रासह जिल्हास्तरीय समितीसमोर मंजुरीसाठी ठेवणे, मान्यता प्राप्त झाल्यानंतर संबंधीतांना कळविणे, इत्यादी कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल प्रत्येक बैठकीत द्यावा.

तसेच --

१) जिल्हाधिका-यांमार्फत वितरीत करण्यात आलेला सदरील निधी हा नगरपरिषदांच्या बाबतीत संबधीत नगरपरिषदेचे मुख्याधिकारी व जिल्हाधिकारी अथवा त्यांचे स्थानिक प्रतिनिधी व जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे नांवे राष्ट्रीयकृत बँकेच्या "संयुक्त बँक खात्यामध्ये" जमा करावा. महानगरपालिकांच्याबाबतीत हा निधी आयुक्त, जिल्हाधिकारी व जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे नांवे राष्ट्रीयकृत बँकेच्या "संयुक्त बँक खात्यामध्ये" जमा करावा. जेणेकरुन हा निधी केवळ या योजनेतंर्गतच्या विहित प्रयोजनासाठीच खर्च होईल.

२) अशा प्रकारे संयुक्त बँक खात्यावर जमा करण्यात आलेल्या निधी हाती घेण्यात आलेल्या कामांच्या प्रगतीनुसार टप्प्या-टप्प्याने खर्च करण्यात यावा. निधीच्या बँक खात्यातील वितरणासाठी वर नमूद केलेल्या अधिका-यांपैकी कोणत्याही दोन व्यक्तींची सही आवश्यक असेल तसेच नगरपरिषदांच्या बाबतीत नगरपरिषद मुख्याधिका-यांची व महानगरपालिकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्तांची सही आवश्यक राहील.

क) या योजनेंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत करण्यात आलेल्या निधींचा विनियोग विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसारच होईल याबाबतची खबरदारी संबंधीत जिल्हाधिकारी, यांनी घ्यावी व याबाबत काही अनियमितता आढळल्यास त्याचा अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

ख) या योजनेच्या गैरकारभारासंदर्भातील तक्रारींच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील त्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांनी जिल्हास्तरावर नगर रचना कार्यालयातील अधिका-याच्या मदतीने आवश्यक ती तांत्रिक व प्रशासकीय चौकशी प्राथमिक स्वरुपात करुन आपला अहवाल शासन परिपत्रक क्र.एमआयएस-१०९८/११४७/प्र.क्र.२६३/८९/नवि-१५,दि.१/११/८९ व एमआयएस-१०९४ /७३१/प्र.क्र.२७९/९४/नवि-१५. दि.३०/१२/९४ मधील विहित विवरणपत्रात शासनास पाठविणे आवश्यक राहिल.

ग) या योजनेतंर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी मागील आर्थिक वर्षामध्ये त्यांना वितरीत करण्यात आलेल्या निधीचा पूर्णपणे विनियोग करुन "विनियोग प्रमाणपत्र" सादर केल्याशिवाय पुढील अनुदान वितरीत करु नये.

घ) प्रत्येक वित्तीय वर्षामध्ये शासनाकडून उपलब्ध झालेल्या जिल्हानिहाय तरतूदीमधून नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान वितरीत केल्यानंतर उर्वरित रक्कमेच्या प्रत्यार्पणाचा प्रस्ताव १५ मार्च, पूर्वी शासनास खास दूतामार्फत सादर करावा. ज्या जिल्हयांच्या प्रत्यार्पणाचे प्रस्ताव शासनास १५ मार्च, पूर्वी प्राप्त होणार नाहीत. अशा जिल्हयांची उर्वरित रक्कम व्यपगत होईल व त्याची सर्व जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकारी, यांचीच असेल याची देखिल नोंद घ्यावी.

ङ) सर्व जिल्हाधिका-यांनी या योजनेतंर्गत आपल्या जिल्हयातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत निधीचा वर्षनिहाय तपशील, प्राप्त निधीतून हाती घेतलेली कामे, त्यापैकी पूर्ण कामे, अपूर्ण कामे, खर्च झालेली रक्कम व अखर्चित रक्कम इ. बाबतचा अभिलेख ठेवावा व ही माहिती शासनास तारांकित प्रश्न, कपात सूचना, शासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी व मंत्रालयीन स्तरावरील महत्वाच्या बैठकांसाठी आवश्यकतेनुसार तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

च) प्रत्येक तिमाही बैठकीनंतर संबंधीत जिल्हाधिकारी यांनी ह्या नागरी संस्थांनी या योजनेतंर्गत हाती घेतलेल्या कामकाजाच्या प्रगतीबाबतचा अहवाल नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई तसेच सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पाठवावा. अहवालामध्ये नागरी संस्थानिहाय हाती घेतलेल्या कामकाजाचे स्वरुप व संख्या पूर्णत्वाची स्थिती, अडचणी असल्यास त्याबाबतची माहिती द्यावी.

म) सदरहू योजनेंतर्गत वितरीत करण्यात आलेला निधी ज्या नागरी स्थानिक संस्था आर्थिक वर्ष समाप्ती अखेर खर्च करु शकणार नाहीत. त्यांची यादी नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई व सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना जिल्हाधिकारी यांनी पाठवावी.

शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे सर्व संबंधीतांनी काटेकोरपणे पालन करावे.

प्रस्तुतचा शासन निर्णय समाजकल्याण विभागाच्या अनौ. संदर्भ क्र.१२८/विवयो२,दि.२४.१०.२००१ अन्वये व वित्त विभागाच्या अनौ.संदर्भ क्र.१२३८/व्यय-३, दि.२३.१२.२००१ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
(भा. ई. नगराळे)
महाराष्ट्र शासनाचे सह सचिव.

प्रति,

महालेखापाल-१, मुंबई,

महालेखापाल-२, नागपूर,

प्रधान सचिव, नियोजन विभाग, मुंबई -३२.

प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

सचिव, समाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

विभागीय आयुक्त, (सर्व महसूली विभाग)

आयुक्त,सर्व महानगरपालिका.